# कृषि सेवक भरती-२०१९ अंतिम निवड यादी बाबत निवेदन

## कार्यालय- विभागीय कृषि सहसंचालक, अमरावती विभाग, अमरावती

अमरावती विभागाच्या कृषि सेवक पदाच्या भरती जाहिरात क्र.— विकृससंअम/अ-३/सन-२०१९/गट-क/कृसे भरती/५९/१९ अमरावती, दि.०३/०१/२०१९ जाहिराती नुसार दि.२२ ते २४ फेब्रुवारी २०१९ रोजी महापरिक्षा द्वारे महाराष्ट्रातील विविध केंद्रावर परिक्षा घेण्यात आली होती. त्या परिक्षेच्या अनुषंगाने उमेदवाराची सर्वसाधारण अंतिम गुणवत्ता यादी दि.१६/०९/२०१९ रोजी अंतरिम निवड यादी दि.०१/११/२०१९ रोजी कृषि विभागाचे संकेतस्थळ www.krishi.maharashtra.gov.in वर प्रसिध्द करण्यात आली होती. तद्नंतर दि.१४ ते १६ नोव्हेंबर, २०१९ या कालावधीत अंतरिम निवड यादीतील निवड केलेल्या उमेदवारांच्या मुळ कागदपत्रांची या कार्यालयाचे स्तरावर पडताळणी करण्यात आली होती. सदर दिनांकास गैरहजर असलेल्या उमेदवारांना पुनश्चः कागदपत्रे पडताळणीसाठी दि.२४ डिसेंबर, २०१९ ला अंतिमरित्या बोलाविण्यात आले होते. तसेच समांतर आरक्षणांतर्गत निवड झालेल्या उमेदवारांचे प्रमाणपत्रे संबंधीत प्राधिकाऱ्यांकडे फेर-तपासणी करीता या कार्यालयामार्फत पाठविण्यात आले आहे. या कार्यालयाचे स्तरावर उमेदवारांचे मुळ कागदपत्रे पडताळणीच्या अनुषंगाने, अंतरिम निवड यादीवर प्राप्त आक्षेप/ निवेदनांचा प्रचलित शासन निर्णयानुसार विचार करुन तसेच विभागीय निवड समितीने केलेल्या सुक्ष्म निरिक्षणान्वये अंतिम निवड यादी तयार करुन प्रसिध्द करण्यात येत आहे.

१. समांतर आरक्षणांतर्गत निवड झालेल्या उमेदवारांस संबंधीत प्राधिकृत अधिकाऱ्यांनी फेर-तपासणीमध्ये अपात्र ठरणाऱ्या / शैक्षणिक कारणास्तव / ईतर कोणत्याही कारणास्तव निवडीसाठी अपात्र ठरणाऱ्या उमेदवाराचे नाव सदर अंतिम निवड यादीमधुन वगळण्याचे तथा अंतिम निवड यादीमध्ये बदल करण्याचा अधिकार मा.वि.कृ.स.सं.अमरावती यांनी स्वतः कडे राखुन ठेवलेले आहेत.

२. मर्यादीत विभागीय परिक्षेद्वारे कृषि सहाय्यक संवर्गातुन कृषि पर्यवेक्षकांची पदे भरल्यानंतर संभाव्य रिक्त होणाऱ्या कृषि सहाय्यक पदांचा विज्ञापीत केलेल्या जाहिराती मधील पदांमध्ये समावेश करण्यात आलेला आहे. तसेच कृषि पर्यवेक्षक पदावर तदर्थ पदोन्नती दिलेल्या कर्मचाऱ्यांनी मा.न्यायालयात याचिका दाखल केलेल्या आहेत व त्या न्यायनिर्णयासाठी प्रलंबीत आहे. मर्यादीत विभागीय परिक्षा व मा.न्यायालयातील प्रलंबीत प्रकरणे या दोन्ही बाबी लक्षात घेता, पदे उपलब्ध होण्यास विलंब होण्याची व पदसंख्येत बदल होण्याची शक्यता असल्याने अंतिम निवड यादीत समावेश झालेल्या उमेदवाराला नियुक्ती बाबत दावा करता येणार नाही. निकाल प्रसिध्द होण्याच्या दिनांकाला अनुसूचित क्षेत्रातील कृषि सहाय्यकांची पदे वगळता अनुसूचित क्षेत्राबाहेर उपलब्ध असलेली पदे अत्यंत अल्प असल्याने दि.३१/१२/२०१९ पर्यंत रिक्त होणारी संभाव्य पदे विचारात घेतलेली असल्यामुळे, निवडीस पात्र ठरलेल्या व ज्या प्रमाणात प्रवर्गनिहाय रिक्त पदे उपलब्ध होतील, त्या प्रमाणात नियुक्ती बाबत कार्यवाही करण्यात येईल. यासाठी आपले लक्ष जाहिरातीतील मुद्दा क्र.२.१ परिच्छेद दोन (पृ.क.३) कडे वेधण्यात येत आहे. त्यामुळे एकाच भरती प्रक्रीयेतील कृषि सेवकांचा नियुक्ती आदेश कधी निर्गमित झाला हे लक्षात न घेता कृषि सहाय्यक कर्मचाऱ्यांची ज्येष्ठता त्यांचे कृषि सेवक स्पर्धा परिक्षेतील गुण व सेवाप्रवेशोत्तर नियम १९७५ ९(३) मधील तरतुदीनुसार निश्चित करण्यात येईल.

३. सामान्य प्रशासन विभागाच्या दि.११/१२/२०१८ च्या शासन निर्णयानुसार सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागास प्रवर्गाचे आरक्षण १६ टक्के ऐवजी १३ टक्के करण्यात आल्यामुळे सदर प्रवर्गातील पदांच्या संख्येत घट होवुन सदर पदे ३२ ऐवजी २६ करण्यात आली आहे तर खुल्या प्रवर्गातील पदांच्या संख्येत वाढ होवुन सदर पदे १३२ ऐवजी १३८ करण्यात आलेली आहेत.

४. सदर यादी उमेदवारांनी सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे व महापरिक्षा पोर्टलकडे सादर केलेल्या आवेदन पत्रामधील माहितीच्या आधारे व महापोर्टलने दिलेल्या निकालपत्रानुसार तयार करण्यात आली आहे.

५. सदर आवेदन पत्र व कागदपत्रामध्ये चुकीची माहिती सादर केल्यास त्याबाबत उमेदवारास जबाबदार धरण्यात येईल व यामुळे उमेदवारांची निवड सुध्दा रद्द करण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

६. सदर अंतिम निवड यादी ही विभागीय निवड समितीच्या मान्यतेने प्रसिध्द करण्यात येत आहे.

दिनांक :- ०७/०१/२०२०
ठिकाण :- अमरावती

(सुभाष नागरे)
**अध्यक्ष, विभागीय निवड समिती**
**तथा नियुक्ती प्राधिकारी**
**विभागीय कृषि सहसंचालक,**
**अमरावती विभाग, अमरावती**